# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०३/०७/२०२५

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी (NDPS) गुन्हयामध्ये सहभाग असलेल्या १० आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात खापरखेडा पोलीसांनी आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामध्ये सामील असलेल्या टोळीच्या १० सदस्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा म्होरक्या आरोपी नामे १) आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे,रा.वार्ड नं. ३ चनकापूर आणि त्याचे साथीदार आरोपी क्रं २) रोहित देशराज सुर्यवंशी ,वय ३२ वर्षे, रा. वार्ड नं. ३,चनकापूर ता. सावनेर ,३) सुरज उर्फ बारीक रमेश वरणकर, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं.६ चनकापूर,४) विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्ष, रा. पारधी बेडा तिडगी, ता. कळमेश्वर, ५) अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग, वय २९ वर्षे, रा. वार्ड नं. ६ वलनी, ६) गब्बर दत्तूजी जुमळे ,वय ३० वर्षे, रा. वार्ड नं. ६ वलनी, **७)** उदयभान गंगासागर चव्हाण ,वय ३२ वर्षे, रा. वार्ड नं. ६ वलनी ८) लखनसिंग उर्फ विजय सिंग दिलीप सिंग सिकलकर (भटीया), वय ३५ वर्ष,रा. सिंगनूर पोस्टे गोगावा, जि. खरगोन मध्य प्रदेश, मुलताई जिल्हा बैतूल (मध्य प्रदेश),९) शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत, वय २३ वर्ष,रा.ग्राम चौभीया,ता. मुलताई,जि बैतुल (१०) राकेश उर्फ सोनु शिवलाल सुर्यवंशी, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं

६ वलनी या १० आरोपीतांविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २७/०४/२०२५ रोजी **पोलीसांना गुप्त बातमी दारा मार्फतीने खबर मिळाली की, सावनेर मधील गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर हा वलनी येथील अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग च्या घरी हजर असुन त्यांच्या कडे अग्निशस्त्रे आहे. या खबरेवरून पोलीसांनी** अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याचे घरी वार्ड क्र ३ वलनी येथे धाड टाकली असता तेथे आरोपी **अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग** ,आरोपी नामे **आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा** आणि **गब्बर दत्तूजी जुमळे,** हे मिळुन आले. घरझडतीमध्ये **पोलीसांनी १०२८.०५ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा सदृश्य वनस्पती ६ अग्निशस्त्रे, ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळी, ८ ॲड्रॉईड फोन आणि सिमकार्डय असा एकुण २,७१,८०० रु किंमती चा मुद्देमाल जप्त केला. आणि नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ८ (सी) ,२० (बी) (२), २९ एन.डी.पी.एस. सहकलम ३/२५, ५/२५ भारतीय शस्त्र अधिनियम कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचे तपास कामी विशेष तपास पथक गठित करण्यात आले होते. सदर पथकाने सदर गुन्हयाचाा सखोल तपास करून गुन्हयात अनेक बाजु उकल करून, साखळी जोडुन अंमली पदार्थ पुरवठा व विक्री करणारे इतर आरोपीतांचा नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. आरोपी क्र १ ते ७ यांना अटक करण्यात आली असुन आरोपी क्रं ९ शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत, वय २३ वर्ष,रा.ग्राम चौभीया,ता. मुलताई,जि बैतुल याला मध्यप्रदेश मधुन अटक करण्यात आली.**

सदर गुन्हयातील आरोपीतांचा गुन्हेगारांचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता असे निर्दशनास आले की, यातील आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे,रा.वार्ड नं. ३ चनकापूर आणि त्यांचे ईतर साथीदारांची गुन्हेगारी करणारी टोळी असुन ते संघटीत रित्या आर्थिक फायदयासाठी अंमली पदार्थांची विक्री करणे तसेच परिसरात त्यांचे टोळीची दहशत पसरविणसाठी, खुन, खुनाचा प्रयत्न करने, प्राणघातक शस्त्र बाळगणे, अवैध अग्निशस्त्र विक्री करणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे तसेच गंभीर दुखापत पोहचवून जिवे मारण्याची धमकी देणे, अवैध्य रित्या दारू विक्री करणे व अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. सदर संघटीत रित्या गुन्हेगारी करणाऱ्या टोळीचा म्होरक्या आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे,रा.वार्ड नं. ३ चनकापूर ता. सावनेर जिल्हा नागपूर, हा असुन त्याने अल्प कालावधी मध्ये वलनी व चनकापुर परिसरात स्वतःचे गुन्हेगारी साम्राज्य निर्माण केलेले आहे. आरोपी आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा,हा नेहमीच त्याचे टोळीतील साथीदार तसेच त्यांचे व्यतिरीक्त आणखी नव–नवीन सदस्यांना सोबत घेवुन गुन्हे करीत असतो. टोळीचा म्होरक्या आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू आणि टोळीतील सदस्यांवर अनेक दखलपात्र गंभीर गुन्हे नोंद आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. त्यामुळे नमुद १० आरोपीच्या टोळीवर १० आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावण्यात आला आहे.



आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा






रोहित देशराज सुर्यवंशी

सुरज उर्फ बारीक रमेश वरणकर






विश्वास राहुल सोलंकी

अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग



गब्बर दत्तूजी जुमळे



उदयभान गंगासागर चव्हाण



**शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत,**